जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७५९ दिनांक - २५/१०/२०२३**

# आर्थिक गुन्हे शाखा,पुणे शहर

विश्रामबाग पोलीस स्टेशन गु.र.नं.२१०/२०२३ भादंवि कलम ४२०,३४ सह महाराष्ट्र ठेवीदारांचे हितरक्षण अधिनियम १९९९ (एमपीआयडी) कायदा कलम ३ अन्वये उदय त्र्यंबक जोशी व त्यांचा मुलगा मयुरेश उदय जोशी,रा.पानमळा,दांडेकर पुल,पुणे यांचेविरुध्द दिनांक २३/०९/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

गॅस एजन्सीमध्ये रक्कम गुंतविल्यास बॅंकेपेक्षा चांगला परतावा देण्याचे आमिष दाखवून आरोपी उदय त्र्यंबक जोशी व त्यांचा मुलगा मयुरेश उदय जोशी यांनी अनेकांना कोटयावधी रुपयांचा गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आत्तापर्यंत ०९ जणांनी पुढे येवून त्यांची ५ कोटी ५३ लाख ८ हजार रुपयांची फसवणुक झाली असुन त्यांनी आर्थिक गुन्हे शाखेकडे तक्रारी दिल्या आहेत.

आरोपी मयुरेश जोशी याने रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडीयाची कोणतीही परवानगी नसताना वार्षिक १२ टक्के व्याजाच्या खोटया एफडी सर्टीफिकेटस फिर्यादी यांना देवून अनेकांची फसवणुक केली आहे.

नमुद आरोपी उदय त्र्यंबक जोशी व त्यांचा मुलगा मयुरेश उदय जोशी यांनी अशा प्रकारे कोणाची फसवणुक केली असेल, तर त्यांनी सर्व कागदपत्रांसह **श्री.गुरुदत्त मोरे, पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, पुणे शहर, मो.नं. ७३५००८७२६६ यांचेशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.**